# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**5 JULY, 2018**

[Time : 09-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना :** गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करु नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती अंतराने टंकलिखित करा.

---

**[गुण : ४०]**

प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी अक्षरश: गळेकापू स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे. दिवसेंदिवस एकीकडं महागाई वाढत आहे. दुसरीकडं भ्रष्टाचार वाढत आहे. अशा परिस्थितीत सर्व स्तरांतल्या माणसांचा जगण्याचा संघर्षही वाढत आहे. आपल्या मुलांना या परिस्थितीत स्वत:च्या पायावर उभं करण्यासाठी काय काय करावं लागेल, हे मोठं प्रश्नचिन्ह पालकांच्या समोर आहे. त्यातून पालक बऱ्याचदा स्वत:चा मार्ग काढतात. हा मार्ग म्हणजे मुलाला जास्तीत जास्त भौतिक सुविधा पुरवण्याचा आटापिटा करायचा आणि मग मुलानं त्याच्या क्षमता जास्तीत जास्त वापराव्यात, अशी अपेक्षा ठेवायची. जिथं जिथं हे प्रमाण व्यस्त होईल, तिथं तिथं पालक आणि मुलं यांच्यात संघर्षाची परिस्थिती निर्माण होते. आधीच मुलांचे टोकदार झालेले अहंकार, त्यांची कमी समायोजनक्षमता आणि त्यात भर पडते ती पालक आणि मुलांच्या नात्यात पडलेल्या दरीची. यातून मुलांचं भावविश्व कोलमडतं आणि मुलं टोकाचा निर्णय घेतात.

आजवर ज्या पिढ्या लहानाच्या मोठ्या झाल्या, त्यांच्या कुमारवयात त्यांना काहीच संघर्ष नव्हते असे नाही. परंतु त्या सगळ्याला त्यांना यशस्वीपणे सामोरे जाता आले.

---